## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग, बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे अभिषेक आदिनाथ हिवाळे, वय ३६ वर्ष, व्यवसाय नोकरी,पद—ग्रामसेवक,ग्राम गारडगाव/वाडी,वर्ग—३,पंचायत समिती, खामगाव, जि.बुलडाणा ह.मु.वृदावंन नगर, माळविहीर, चिखली रोड, बुलडाणा रा.साखळी बु.ता.जि.बुलडाणा |
| लाच मागणी | ६०,०००/— |
| लाच स्विकारले | अज्ञात व्यक्तीचे बॅक खातेवर वळती करून लाचेची रक्कम ६०,०००/— रूपये स्विकारले |
| घटनास्थळ | पंचायत समिती कार्यालय,आवार,खामगाव जि.बुलडाणा |
| लाच मागणी पडताळणी दिनांक | दि.१४.०९.२०२१, व दि.२३.११.२०२१ |
| लाच रक्कम स्विकारली दिनांक | पहिला टप्पा दि.०६.०९.२०२१ दुसरा टप्पा दि.१८.११.२०२१ |
| स्विकृती पडताळणी दिनांक | दि.२३.११.२०२१ |

**थोडक्यात हकीकत :—** दि.०८.०९.२०२१ रोजी यातील तक्रारदार यांनी लाप्रवि घटकाकडे दिलेल्या तक्रार दिली की, ते ग्रामपंचायत सदस्य असताना त्यांचे वार्डात १५ व्या वित्त आयोगानूसार केलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे २,८३,५००/—बिल काढून देण्यासाठी यांतील आलोसे अभिषेक हिवाळे, ग्रामसचिव गारडगाव/वाडी हे ६०,०००/— रूपये लाचमागणी करीत आहे. त्यावरून दि.१४.०९.२०२१ रोजी केलेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ६०,०००/— रूपये लाच मागणीबाबत स्पष्टोक्ती करून त्यापैकी दि.०६.०९.२०२१रोजी सदर बिलाचा पाहिला टप्पा ८२,०००/— काढून सदर बिलातून प्रत्यक्ष ६२,०००/— रूपये मजुराच्या खात्यात जमा करून उर्वरीत २०,०००/— रूपये परस्पर अज्ञात ईसमाच्या खात्यात ट्रान्सफर करून काढून घेतल्याची कबुली देवून उर्वरीत बिलातून ४०,०००/— रूपये काढून घेणार असल्याचे सांगीतले त्यानुसार दि.१८.११.२०२१ रोजी लोकसेवक हिवाळे यांनी उर्वरीत बिल काढून सदर बिलातून ४०,०००/— रूपये अज्ञात ईसमाच्या बॅक खात्यात ट्रान्सफर केले त्याबाबत दि.२३.११.२०२१ रोजी स्विकृत पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता पडताळणी दरम्यान लोकसेवक हिवाळे बिलाचे पाहिल्या टप्प्यातून २०,०००/— व दुस—या बिलाच्या टप्प्यातून ४०,०००/— काढून घेतल्याचे पंच क्र.०१ यांचे समक्ष मान्य केल्याने लोकसेवक श्री. हिवाळे यांना ताब्यात घेवून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदर कार्यवाही :— १.मा.श्री.विशाल गायकवाड,पोलीस अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.अरुण सावंत,अप्पर पोलीस अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती
३.श्री.संजय चौधरी,पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा

यांने मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.सचिन इंगळे,पोलीस निरीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा व सापळा पथक एएसआय शाम भांगे,पोना.प्रविण बैरागी,राजु क्षीरसागर,सुनिल राऊत, पोकॉ विनोद लोखंडे, जगदीश पवार,चालक पोकॉ अर्शद शेख यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो, बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे.

Sachin
( सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner